**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. २०५/२००७ मधील नि. क्र. ११५ खालील आदेश</u>**
**<u>(दिनांक १५/०६/२०१६ - शंकर वि. राम)</u>**

सदरचा दुरूस्तीचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या क्रम ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे.

२. सदरचा अर्ज वाचला, तसेच अर्जासोबतचे शपथपत्र नि.क्र. ११६, प्रतिवादी क्र. २ तर्फे दिलेले म्हणणे नि.क्र. १२० विचारात घेतले. प्रस्तुच्या अर्जास प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांनी त्यांचे म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांच्या म्हणण्याविना विचारात घेण्यात येत आहे. वादीचे विधिज्ञ श्री. के. के. गलांडे आणि प्रतिवादी क्र. २ चे विधिज्ञ श्री. एच. यु. लांडे यांचा युक्तीवाद ऐकला असता, माझ्या विचारार्थ खालील मुद्‌दा निघाला, व त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसासहित मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्‌दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीने मागणी केलेली दाव्यातील दुरुस्ती/सुधारणा ही वाद मिळकती बाबतचा खराखुरा प्रश्न निर्णीत करणेसाठी आवश्यक आहे, हे सिध्द केले काय ? | ... होकारार्थी. |
| २) | काय आदेश? | ... अंतिम आदेशा प्रमाणे. |

## <u>का र ण मी मां सा</u>

**<u>मुद्‌दा क्र. १ बाबत</u> :-**

३. वादीचे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा दावा रे.मु.क्र. २०५/२००७ हा वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला होता. परंतु तो दावा खारीज करण्यात आला. त्याच्या विरुध्द वादीने नियमीत दिवाणी अपिल क्र. ०१/२०१० हे दाखल केलेले होते व ते अपिल

मंजूर झाले आणि या दाव्यातील दिनांक २०/११/२००९ रोजीच्या न्यायनिर्णय रद्द केला गेला व वादी आणि प्रतिवादी यांना त्यांच्या वादकथनात दुरूस्ती करण्याची परवानगी देवून, पुरावा देण्याची संधी देवून सदरचा दावा गुणदोषावर निकाली काढण्यात यावा असा आदेश केला गेला.

४. वादीच्या विधिज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, ग्रामपंचायत घर क्र. ८२, ८१, ६ व ५ या घर जागा या दाव्यात समाविष्ट करण्याच्या आहेत. तसेच प्रतिवादी क्र. २ हिने मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे अपिल चालू असतांना गट क्र. ५६६ ही मिळकत दिनांक २८/११/२०१४ रोजी तिचा सख्खा भाउ एकनाथ दुधाराम चेडे यांना विक्री केलेली आहे. त्यामुळे एकनाथ दुधाराम चेडे यांना या दाव्यात प्रतिवादी क्र. ६ म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. तसेच दाव्यातील परिच्छेद क्र. १, ३, ४, ६, ७ आणि दाव्याच्या टायटलमध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणेची दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी म्हणून प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. वादीच्या विधिज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, दाव्यातील परिच्छेद क्र. ३ मधील कथन मयत जीजा व त्यांचे भाउ यांच्या वाटपाच्या वेळी दावा मिळकत गट क्र. ५६६ ही त्यांचे भाउ बाबूराव यांच्या नावे होती. परंतु वाटपामध्ये जीजाच्या हिश्यास आली होती म्हणून बाबूराव यांनी सदरची मिळकत जीजाचा मुलगा ओंकार याच्या नावे केली, हे कथन चुकून झालेले आहे, ते खोडण्याची परवानगी देण्यात यावी.

६. याउलट, प्रतिवादी क्र. २ चे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. २ हिने विक्री केलेली मिळकत ही प्रतिवादी क्र. २ हिच्या स्वतंत्र वहिवाटीची होती. प्रस्तुतचा दावा सर्व मुद्दे विचारात घेवून गुणदोषावर निकाली झालेला आहे. तसेच वादी प्रस्तुतच्या दुरूस्तीच्या अर्जाच्या आधारे या पूर्वी दाव्यात नमुद केलेले कथन वगळू इच्छित आहे. त्या अनुषंगाने परिच्छेद ३इ ही दुरूस्ती करता येवू शकत नाही. तसेच पूर्वीचा दावा वाटपासाठीचा होता, परंतु वादी प्रस्तुतच्या दुरूस्तीच्या अर्जाच्या आधरे दिनांक २८/११/२०१४ रोजीचे खरेदीखत वादीच्या हिश्यावर बंधंनकारक नाही, असे जाहिर ठराव होवून मिळण्याची विनंती वादीतर्फे केलेली आहे. त्या विनंतीमुळे दाव्याचे स्वरूप बदलणार आहे. वादीने दुरूस्तीच्या अर्जात नमुद केलेली दुरूस्ती होवून मिळण्यास वादी पात्र नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

७. या उलट, वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवा केला की, नियमीत दिवाणी अपिल क्र. ०१/२०१०

हे न्यायप्रविष्ट असतांना प्रतिवादी क्र. २ हिने गट क्र. ५६६ ही मिळकत दिनांक २८/११/२०१४ रोजी विक्री केलेली आहे. त्यामुळे संबंधीत जाहिर ठराव याची दुरूस्ती वादीने दाव्यात मागितलेली आहे.

८. वादी व प्रतिवादी यांना ही बाब कबूल आहे की, प्रस्तुतचा दावा रे.मु.क्र. २०५/२००७ हा तत्कालीन न्यायीक अधिकारी यांनी दिनांक २०/११/२००९ रोजीच्या न्यायनिर्णयाच्या आधारे खारीज केला. त्या न्यायनिर्णयाच्या विरूध्द वादीने नियमीत दिवाणी अपिल क्र. ०१/२०१० हे मा. जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांच्याकडे दाखल केले होते व ते अपिल दिनांक २०/०१/२०१६ रोजी मंजूर झाले आणि प्रस्तुतच्या दाव्यातील न्यायनिर्णय रद्द करण्यात आला. मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांनी त्याच आदेशात वादी व प्रतिवादी यांना त्यांच्या वाद कथनात दुरूस्ती करण्याची संधी देवून त्यांचा जादाचा तोंडी व कागदोपत्री पुरावा विचारात घेवून प्रस्तुतचा दावा सहा महिन्यात गुणदोषावर निकाली काढण्यात यावा, असे आदेशित केलेले आहे.

९. वादीने प्रस्तावीत दुरूस्ती ३इ ही मयत जीजा व त्यांचे भाउ यांच्या वाटपाच्या वेळी दावा मिळकत गट क्र. ५६६ ही त्यांचे भाउ बाबूराव यांचे नावे होती, परंतु वाटपामध्ये जीजाच्या हिश्यास आली होती. म्हणून बाबूराव यांनी सदरची मिळकत जीजाचा मुलगा ओंकार याच्या नावे केली, हे कथन चुकून झालेले आहे, व ते खोडण्याबाबत परवानगी मागितली. हे सर्वज्ञात आहे की, एखाद्या दाव्यात/वादकथनात काही कबुली दिली गेली असेल, तर ती कबुली दुरूस्ती अर्जाच्या आधारे वगळता येवू शकत नाही. त्यामुळे या परिस्थिती वादी प्रस्तावीत दुरूस्ती ३इ ही मंजूर होवून मिळण्यास पात्र ठरत नाही.

१०. प्रतिवादी क्र. २ हिने गट क्र. ५६६ ही मिळकत दिनांक २८/११/२०१४ रोजी एकनाथ दुधाराम चेडे यांना विक्री केली नाही, असे प्रतिवादी क्र. २ हिचे म्हणणे नाही. दिनांक २८/०४/२००४ रोजीच्या त्या खरेदीखताच्या अनुषंगाने ते झालेले खरेदीखत वादीच्या हिश्यावर बंधंकारक नाही, असा जाहिर ठराव होवून मिळण्याची दुरूस्ती करण्यास वादी पात्र ठरतो.

११. प्रस्तुतचा दावा मा. जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांच्या दिनांक २०/०१/२०१६ रोजीच्या आदेशानंतर फैलावर घेण्यात आलेला आहे, व त्यानंतर वादीचा प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज दाखल केलेला

आहे. उपरोक्त परिस्थिती विचारात घेतली असता, वादीने अर्जात नमुद केलेप्रमाणेची दुरूस्ती दाव्यात केल्यानंतर प्रतिवादी क्र. २ हीस त्या दुरूस्तीच्या अनुषंगाने तिच्या कैफियतमध्ये योग्य ती परिणामकारक दुरूस्ती करता येवू शकते. तत्कालीन न्यायीक अधिकारी यांनी या दाव्यात पारीत केलेला दिनांक २०/११/२००९ रोजीचा न्यायनिर्णय मा. जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांनी रद्द केलेला आहे. त्यामुळे ती परिस्थिती आणि उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेतली असता, प्रस्तुतच्या अर्जातील दुरूस्ती/सुधारणा ही या दाव्यातील वाद मिळकती बाबतचा खराखुरा प्रश्न निर्णीत करणेसाठी आवश्यक आहे, व तसे वादीने सिध्द केलेले आहे. प्रस्तुतच्या दुरूस्तीमुळे या दाव्याचे स्वरूप बदलणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) सदरचा दुरूस्तीचा अर्ज अशंत: मंजुर करण्यात येत आहे.

२) वादीने परिच्छेद क्र. १, ३, ४, ६, ७ आणि टायटल यामध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणेची दुरूस्ती आजपासुन १४ दिवसाच्या आत करावी आणि दुरूस्त दाव्याची प्रत त्वरीत मुदतीत दाखल करावी.

३) वादीची अर्जात नमुद केलेली ३इ मधील कथन खोडण्याची विनंती नामंजूर करण्यात येत आहे.

४) प्रतिवादींनी त्यांची कैफियत यामध्ये संबंधीत दुरूस्तीच्या अनुषंगाने परिणामकारक दुरूस्ती करावयाची असल्यास, त्याबाबतचा दुरूस्तीचा अर्ज दाखल करावा अन्यथा दुरूस्ती करावयाची नसल्यास तशी पुरसीस दाखल करावी.

(धनंजय भ .हंबीरे)
दिनांक :-१५/०६/२०१६. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, शेवगांव.